**विशेष केंद्रीय सहाय्य योजनेअंतर्गत मंजूर "Setting of १५० scholarship cells" या योजनेच्या मार्गदर्शक तत्वांना मंजूरी देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः केंद्रीय-२०१८ /प्र.क्र.१५ /का-१९**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
तारीख: ११ एप्रिल, २०१८

**संदर्भ-**

१. **जनजाती कार्य मंत्रालय,नवी दिल्ली यांचे पत्र क्र.F.No.११०१५/०५/२०१७-TSP, दि.३०/०५/२०१७**
२. **शासन निर्णय क्रमांकः केंद्रिय-२०१७/प्र.क्र.४५/का.-१९, दि. १९/०८/२०१७**

**प्रस्तावना -**

केंद्र शासनाने सन २०१७-१८ करिता विशेष केंद्रीय साहाय्य योजनेअंतर्गत रुपये १२८१०.३८ लक्ष इतक्या निधीच्या एकूण २८ प्रस्तावांना त्यांच्या दिनांक ३०/०५/२०१७ च्या पत्रान्वये मान्यता प्रदान केली आहे. या योजने अंतर्गत केंद्र शासनाने "Setting up १५० scholarship cells" या प्रकल्पा अंतर्गत रु. २२.८८ लक्ष निधी मंजूर केला आहे. सदर निधी संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये आयुक्त आदिवासी विकास, नाशिक यांना वितरीत करण्यात आला आहे. Youth Dreamers Foundation (YDF), Delhi हि संस्था शिक्षण क्षेत्रात उच्च शिक्षणसाठी लागणाऱ्या शिष्यवृत्ती मिळवून देण्यास व करियर निवडण्यास सहाय्य करण्याचे कार्य करत आहे. सदर प्रकल्पाची मुख्य उद्दिष्टे शिष्यवृत्ती केंद्राची स्थापना करून आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यास शिष्यवृत्ती मिळवून देणे, करियरसाठी मार्गदर्शन करणे, व्यावसायिक शिक्षणासाठी आवश्यक केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीये साठी मार्गदर्शन करणे व केंद्रीभूत प्रवेशासाठी अर्ज भरून घेणे आणि उच्च शिक्षणातील गळतीचे प्रमाण कमी करणे हि आहेत. YDF संस्थेचे इयत्ता १० वी व १२ वीच्या किमान ८० % विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणा साठी प्रवेश मिळवून देण्याचे लक्ष्य आहे. शिक्षण क्षेत्रात एक नाविन्यपूर्ण प्रकल्प राबविण्याचे विचारात घेता "Setting up १५० scholarship cell" ही योजना Youth Dreamers Foundation(YDF),Delhi या संस्थेमार्फत राबवून सदर योजनेच्या मार्गदर्शक सूचनांना मंजुरी देणे बाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय-**

एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालय, नाशिक व कळवण अधिनस्त आश्रमशाळांमधील १० वी व १२ वी मधील विद्यार्थी उच्च शिक्षणापासून आर्थिक अडचणीमुळे वंचीत राहू नये व सर्वांना उच्च शिक्षणासाठी प्रवेश मिळावा म्हणून "Setting up १५० scholarship cell" ही योजना Youth Dreamers Foundation(YDF) व आदिवासी विकास विभागामार्फत संयुक्तपणे रुपये २२.८८ लक्ष इतक्या उपलब्ध निधीच्या योजनेच्या मार्गदर्शक सूचनांना या निर्णयाद्वारे सोबत जोडलेल्या परिशिष्ट क्रमांक १ नुसार मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

२. सदर योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार वितरीत तरतूदींच्या मर्यादेत योजना राबविण्याबाबत त्वरीत कार्यवाही करण्यात यावी. सदर योजनेच्या अंमलबजावणी प्रक्रीयेमध्ये काही बदल किंवा सुधारणा करण्याचे अधिकार सनियंत्रण समितीस राहतील.

३. Youth Dreamers Foundation (YDF), Delhi या संस्थेने नेमून दिलेल्या कामाचा अहवाल, उपयोगिता प्रमाणपत्र आर्थिक व भौतिक तसेच योजनेचा फलनिष्पत्ती अहवाल प्रकल्प कार्यालयामार्फत आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांना सादर करावा.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४१११२३४५७०४२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ajitsingh R Rajput

Digitally signed by Ajitsingh R Rajput
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=TDD Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a614ce75be611413980d3efebe7cde81ad571ab119e8360b7b526b5159edd099, serialNumber=32168d31c7d800af039db3657f6a01d233033f3f7c16b7ca135b2c868025eb3e, cn=Ajitsingh R Rajput
Date: 2018.04.11 12:36:30 +05'30'

(अ.रा.राजपूत)
कार्यासन अधिकारी

**प्रत,**

१. मा.मंत्री आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, यांचे खाजगी सचिव ,मंत्रालय,मुंबई
२. मा.राज्यमंत्री आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. प्रधान सचिव,आदिवासी विकास,मंत्रालय,मुंबई
४. आयुक्त,आदिवासी विकास,महाराष्ट्र राज्य,नाशिक.
५. सहसचिव,आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई.
६. उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक.
८. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नाशिक व कळवण
९. अध्यक्ष, Youth dreamers Foundation, Delhi
१०. संगणक समन्वयक,आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई
११. निवड नस्ती (का.१९) आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई.

## विशेष केंद्रीय साहाय्य अंतर्गत सन २०१७-१८ मधील प्रकल्प

## परिशिष्ट-१

<table>
<tr><td>१</td><td>योजनेचे नांव -</td><td>आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती कक्षाची स्थापना करणे.</td></tr>
<tr><td>२</td><td>लाभार्थी/ युनिट संख्या.</td><td>नाशिक जिल्हा :- ६ तालुके<br>१) प्रकल्प कार्यालय- नाशिक -३ तालुके (दिंडोरी, पेठ, त्रिंबक)<br>२) प्रकल्प कार्यालय- कळवण- ३ तालुके (कळवण, सुरगाणा, सटाणा)<br>वरील ६ तालुक्यातील इयत्ता १० वी व १२ वी मधील २२ शाळेतील विद्यार्थी<br>सोबत परिशिष्ट २ मध्ये २२ शाळांची यादी जोडलेली आहे.
<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>जिल्ह्याचे नाव</th><th>तालुक्याचे नाव</th><th>शाळेची संख्या</th></tr>
<tr><td>१</td><td>नाशिक</td><td>दिंडोरी</td><td>२</td></tr>
<tr><td>२</td><td>नाशिक</td><td>पेठ</td><td>३</td></tr>
<tr><td>३</td><td>नाशिक</td><td>त्रिंबक</td><td>३</td></tr>
<tr><td>४</td><td>नाशिक</td><td>कळवण</td><td>८</td></tr>
<tr><td>५</td><td>नाशिक</td><td>सुरगाणा</td><td>२</td></tr>
<tr><td>६</td><td>नाशिक</td><td>सटाणा</td><td>४</td></tr>
<tr><td></td><td>एकूण</td><td></td><td>२२</td></tr>
</table></td></tr>
<tr><td>३</td><td>अंमलबजावणी अधिकारी</td><td>एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प नाशिक व कळवण</td></tr>
<tr><td>४</td><td>योजना राबविणारी यंत्रणा</td><td>प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नाशिक व कळवण आणि युथ ड्रीमर्स फौंडेशन, दिल्ली</td></tr>
<tr><td>५</td><td>नियंत्रक अधिकारी</td><td>आयुक्त, आदिवासी विकास नाशिक</td></tr>
<tr><td>६</td><td>योजनेचा उद्देश / हेतु</td><td>समाजातील सामाजिक व आर्थिक वंचित घटकांना शिष्यवृत्ती अर्ज प्रतिबद्धता, करियर समुपदेशन प्रतिबद्धता व जीवन कौशल्य प्रतिबद्धता द्वारे खाली नमूद उद्देश साध्य करणे-<br>१) विद्यार्थ्यांची कल (Aptitude) व मनोवैज्ञानिक चाचणी घेणे.<br>२) आदिवासी विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या संधीपासून कुणीही वंचित राहू नये यासाठी प्रयत्न करणे.<br>३) विद्यार्थांना करियर निवडण्यासाठी मार्गदर्शन करणे.<br>४) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीये साठी मार्गदर्शन करणे व केंद्रीभूत प्रवेशासाठीचे ऑनलाईन / ऑफलाईन अर्ज भरून घेणे<br>५) उच्च शिक्षणातील गळतीचे प्रमाण कमी करणे.<br>६) शिष्यवृत्ती मिळण्यासाठी अर्ज भरून घेणे व शिष्यवृत्ती मिळवून देणे.<br>प्रकल्प उपक्रम :-<br>अ)शिष्यवृत्ती अर्ज प्रतिबद्धता (Scholarship Application Engagement)- दहावी व बारावीच्या विध्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी विविध शिष्यवृत्ती (Government scholarship, CSR Funds scholarships, companies scholarships etc)</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | | मिळविण्यास मदत करणे. शिष्यवृत्ती मिळण्यास लागणारे सर्व सहाय्य करणे उदा. शिष्यवृत्ती मिळण्यासाठी अर्ज भरणे, महाविद्यालय निवडणे, अभ्यासक्रम निवडणे व शिष्यवृत्ती मिळवून देणे.<br><br>**ब) करियर समुपदेशन प्रतिबद्धता(career counselling Engagement)** - इयत्ता दहावी व बारावी तील विद्यार्थ्यांची कल(Aptitude) व मनोवैद्यानिक चाचणी घेणे, विध्यार्थ्यांना करियर निवडण्यास मदत करणे, विविध प्रकारच्या अभ्यासक्रमाची माहिती देणे.केंद्रिभूत प्रवेशप्रक्रियेसाठी मार्गदर्शन करणे व अर्ज भरून घणे.<br><br>**क)जीवन कौशल प्रतिबद्धता (Life Skill Engagement)-** समुपदेशनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे सक्षमीकरण करणे, सामाजिक भेदभाव कमी करून सहज जीवन जगण्यास प्रवृत्त करणे. |
| ७ | योजना राबविण्याची कार्यपध्दती | सदरची योजना युथ ड्रीमर्स फौंडेशन, दिल्ली यांचेमार्फत खालील प्रमाणे राबविण्यात येईल.<br>**१)** युथ ड्रीमर्स फौंडेशन या संस्थेद्वारे प्रकल्प कार्यालय क्षेत्रातील परिशिष्ट- २ मध्ये नमूद शाळांना भेट देऊन संबंधीत आश्रमशाळा मुख्याध्यापक व शिक्षकांना प्रकल्पाची उद्दिष्टे समजावून सांगण्यात येतील.<br>**२)** आदिवासी आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधुन त्यांना विविध उपक्रमांची माहिती देण्यासाठी सत्र आयोजित केले जाईल.<br><br>➢ आदिवासी भागातील आश्रमशाळेत आयोजित करण्यात येणा-या उपक्रमाविषयीची रुपरेषा खालील प्रमाणे :-<br>**अ)करियर समुपदेशन प्रतिबद्धता(career counselling Engagement)** व **जीवन कौशल प्रतिबद्धता (Life Skill Engagement)-**<br>१) सदर प्रकल्प अंमलबजावणीसाठीचे वर्षभराचे वेळापत्रक संबंधित आश्रमशाळा मुख्याध्यापक व शिक्षकांशी चर्चा करून ठरविण्यात येईल.<br>२) सर्व शाळांचे प्रकल्प अंमलबजावणी संबंधीचे वेळापत्रक संबंधित प्रकल्प अधिकारी यांचे सोबत चर्चा करून अंतिम केले जाईल. वेळापत्रकापमध्ये काही बदल करावयाचा झाल्यास होणारा बदल संबंधित प्रकल्प अधिकारी व आश्रमशाळा मुख्याध्यापक यांचेशी चर्चा करूनच केला जाईल.<br>३) आश्रमशाळेमध्ये मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थ्यांशी करियर मार्गदर्शक व जीवन कौशल्य साठी विषयनिहाय विविध सत्रांचे (Orientation Session) आयोजन केले जाईल.<br>४) सत्रामध्ये लागणारी विविध माहिती पुस्तिके व इतर आवश्यक साहित्य संस्थेमार्फत पुरविले जाईल.<br>५) संस्था प्रत्येक महिन्याचा प्रगती अहवाल संबंधित प्रकल्प अधिकारी यांना व त्रैमासिक भौतिक व आर्थिक अहवाल अप्पर आयुक्त, आदिवासी विकास नाशिक व आयुक्त आदिवासी विकास, नाशिक यांना सादर करेल. |

**विषय निहाय सत्राची यादी**

| अ. क्र. | सत्राचे नाव | सत्रांची संख्या | अंमलबजावणी प्रस्तावित महिना | सत्राचे एकूण तास |
|---|---|---|---|---|
| १ | स्वतःची ओळख | १ | जुन | ३ तास |
| २ | कल व मनोवैज्ञानिक चाचणी | १ | जुलै | ५ तास |
| ३ | वातावरणाची समज | १ | ऑगस्ट | ६ तास |
| ४ | नियोजन व प्रतिबिंब (Reflection) | १ | ऑगस्ट | २ तास |
| ५ | भावनात्मक चांगुलपणाची समज | १ | सप्टेंबर | ६ तास |
| ६ | सामुदायिक प्रकल्प एकत्रीकरण | १ | सप्टेंबर | २ तास |
| ७ | भाषा कौशल्य निर्मिती | १ | ऑक्टोबर | ४ तास |
| ८ | आर्थिक साक्षरता | १ | ऑक्टोबर | ४ तास |
| ९ | डिजिटल साक्षरता | १ | नोव्हेंबर | ४ तास |
| १० | सुसंवाद कौशल्य | १ | नोव्हेंबर | ४ तास |
| ११ | जबाबदार निर्णयक्षमता घेणे | २ | डिसेंबर | ८ तास |
| १२ | ध्येय व निर्णयक्षमता पुनर्भेट | २ | डिसेंबर | ८ तास |
| १३ | पाठपुरावा करणे | १ | जानेवारी | ८ तास |

**ब)शिष्यवृत्ती अर्ज प्रतिबद्धता** (Scholarship Application Engagement):-

१) शिष्यवृत्ती साठी माहितीचे सत्र आयोजीत करणे.

२) शिष्यवृत्ती मिळविण्यासाठी लागणाऱ्या माहितीचा डेटा एकत्रित करणे.

३) शिष्यवृत्ती मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांचे प्रोफाइल निर्मिती करणे.

४) विद्यार्थ्यांच्या माहितीचा डेटाबेस बनविणे.

५) डेटा शिष्यवृत्ती मिळण्यास लिंक करणे.

५) शिष्यवृत्ती मिळविण्याच्या कामकाजाचा पूर्णत्वास पाठपुरावा करणे व अनुशेष (Follow up and Backlog) राहिल्यास पूर्ण करणे.

६) शिष्यवृत्तीचे संबंधीचे सर्व सहाय्य करण्यास नाशिक येथे शिष्यवृत्ती केंद्र उभारणे.

**क)** सन २०१७-१८ मध्ये १० वी,१२ वी परिक्षेसाठी बसलेल्या विद्यार्थ्यांना केवळ करिअर मार्गदर्शन,केंद्रिभूत प्रवेशप्रक्रियेसाठी अर्ज भरून घेणे तसेच शिष्यवृत्ती अर्ज भरून घेवून शिष्यवृत्ती मिळवून देणे ही उद्दिष्टे राहतील.

| | | |
|---|---|---|
| ८ | निधी वितरण | मंजूर निधी- रू. २२.८८ लक्ष<br>**निधी वितरणाची कार्यपध्दती :-**<br>१)मार्गदर्शक तत्वे मंजूर होताच युथ ड्रीमर्स फौंडेशन हि संस्था कार्यारंभ करेल.<br>२)योजनेचा निधी आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक हे युथ ड्रीमर्स फौंडेशन या संस्थेस वितरीत करतील.<br>३) प्रथम हप्ता म्हणून ५० % रक्कम अदा केली जाईल व पूर्ण झालेल्या कामाच्या प्रगतीनुसार उर्वरित निधी वितरीत करण्याबाबत सनियंत्रण समितीचे अध्यक्ष - आयुक्त, आदिवासी विकास नाशिक निर्णय घेतील.<br>४)नियंत्रक अधिकारी हे प्रकल्प राबविण्यास लागणाऱ्या प्रशासकीय खर्चासाठी मंजूर निधीपैकी ५ % रक्कम राखीव ठेवतील. |
| ९ | योजनेचा कालावधी | जून २०१८ ते मे २०१९ |
| १० | लाभार्थी निवड | परिशिष्ट-२ मधील २२ आश्रमशाळेतील सन २०१७-१८ मध्ये १० वी व १२ वी च्या परिक्षेला बसलेले विद्यार्थी व सन २०१८-१९ मध्ये इयत्ता १० वी व १२ वी च्या परिक्षेला बसणारे सर्व विद्यार्थी उपक्रमामध्ये सहभागी होतील. |
| ११ | योजनेच्या अटी व शर्ती | १) मार्गदर्शक तत्वे मंजूर होताच युथ ड्रीमर्स फौंडेशन हि संस्था कार्यारंभ करेल.<br>२) संस्था प्रत्येक महिन्यास संबंधित अंमलबजावणी अधिकारी व अप्पर आयुक्त आदिवासी विकास, नाशिक यांना या योजनेचा मासिक खर्च व प्रगती अहवाल सादर करेल, तसेच त्रैमासिक भौतिक व आर्थिक अहवाल नियंत्रक अधिकारी आयुक्त, आदिवासी विकास नाशिक यांना सादर करेल.<br>३) योजनेच्या अंमलबजावणीचा फलनिष्पत्ती अहवाल सदर संस्था अंमलबजावणी अधिकारी व नियंत्रक अधिकारी आयुक्त, आदिवासी विकास नाशिक यांना सादर करतील.<br>४)अंमलबजावणी अधिकारी हे योजनेच्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र अपर आयुक्त यांना सादर करतील. अपर आयुक्त हे वरील प्रमाणे अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्र आयुक्त आदिवासी विकास यांना सादर करतील.<br>५) प्रकल्पाची छायाचित्रांसह यशोगाथा तयार करणे तसेच योजने विषयी र्सव माहिती उदा. विद्यार्थ्यांची यादी, योजना अंमलबजावणीचे फोटो, यशोगाथा, विद्यार्थ्यांच्या माहितीचा डेटाबेस इत्यादी अनुषंगीक माहिती आदिवासी विकास विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्याची तसेच सदर माहिती वरिष्ठ कार्यालयास सादर करण्याची जबाबदारी संबंधीत प्रकल्प अधिकारी यांची राहील. |
| १२ | योजनेचे सनियंत्रण व मुल्यमापन, पर्यवेक्षण | प्रस्तूत योजना शिक्षण क्षेत्रातील पथदर्शी स्वरुपाची असल्याने या योजनेच्या अंमलबजावणीस गती देण्यासाठी व परीक्षण करण्यासाठी खालील समिती गठीत करण्यात येत आहे -<br>१. आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक- अध्यक्ष<br>२. अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक - सदस्य<br>३. प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि.प्र., नाशिक- सदस्य सचिव<br>४. प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि.प्र., कळवण - सदस्य<br>५. जिल्हा शिक्षण अधिकारी ,नाशिक -सदस्य<br>६. दोन शाळा प्रमुख(Head master), ए.आ.वि.प्र., कळवण /नाशिक - सदस्य |

| | | |
|---|---|---|
| | | ७. युथ ड्रीमर्स फौंडेशन- कार्यक्रम प्रमुख- सदस्य<br>या समितीने योजनेच्या अंमलबजावणी दरम्यान योजनेच्या अंमलबजावणीचे त्रैमासीक परीक्षण करावे व योजनेच्या फलिताचे मुल्यमापन करावे व योजनेच्या अंमलबजावणीतील समस्या असल्यास त्यांचे निराकरण करावे. तसेच नियंत्रक अधिकारी आयुक्त, आदिवासी विकास नाशिक यांनी योजनेच्या अंमलबजावणीबाबतचा फलनिष्पत्ती अहवाल शासनास सादर करावा. |
| १३ | योजनेची फलनिष्पती | **संख्यानिहाय फलनिष्पत्ती**-<br>१) आदिवासी आश्रम शाळेतील किमान ८० % विद्यार्थ्यांना कॉलेज मध्ये प्रवेश मिळवून देण्याचे लक्ष आहे.<br>२) प्रवेश घेतलेल्या १०० % विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे अर्ज भरले जातील.<br>३) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेचे online अर्ज भरले जातील.<br>**गुणवत्तापूर्ण फलनिष्पत्ती**-<br>१) आदिवासी विद्यार्थ्यांना दहावी व बारावी नंतर पुढील उच्च शिक्षणात विविध गुणवत्तापूर्ण अभ्यासक्रमासाठी चांगल्या महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळेल.<br>२) आदिवासी आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळेल.<br>३) आदिवासी विद्यार्थ्यांचा स्वतःचा आत्मविश्वास व आदर वाढेल.<br>४) आदिवासी विद्यार्थ्यांचा राहणीमानाचा दर्जा उंचावेल.<br>५) आदिवासी विद्यार्थीना नोकरी मिळण्यास व स्वरोजगारास चालना मिळेल.<br>६) आदिवासी विद्यार्थी उच्च शिक्षणामुळे समाजामध्ये रोल मॉडेल बनतील. |

## परिशिष्ट-२

| अ क्र | प्रकल्प कार्यालय | शाळेचे ठिकाण | आश्रमशाळा (शासकीय/अनुदानित) | तालुका |
|---|---|---|---|---|
| १ | नाशिक | काहोर | शासकीय | पेठ |
| २ | नाशिक | बोरीपाडा | शासकीय | त्र्यंबक |
| ३ | नाशिक | नानशी | शासकीय | दिंडोरी |
| ४ | नाशिक | असरबारी | शासकीय | पेठ |
| ५ | नाशिक | देवगाव | शासकीय | त्रंबक |
| ६ | नाशिक | नालेगाव | शासकीय | दिंडोरी |
| ७ | नाशिक | ठाणपाडा | शासकीय | त्र्यंबक |
| ८ | नाशिक | म्हसगन | शासकीय | पेठ |
| ९ | कळवण | चानकपूर | शासकीय | कळवण |
| १० | कळवण | कानशी | शासकीय | कळवण |
| ११ | कळवण | दलवट | शासकीय | कळवण |
| १२ | कळवण | गाणोरे | शासकीय | कळवण |
| १३ | कळवण | मोहनदरी | शासकीय | कळवण |
| १४ | कळवण | खिरद | शासकीय | कळवण |
| १५ | कळवण | नारूळ | शासकीय | कळवण |
| १६ | कळवण | काथरे डिगर | शासकीय | कळवण |
| १७ | कळवण | मानी | शासकीय | सुरगणा |
| १८ | कळवण | पळसन | शासकीय | सुरगणा |
| १९ | कळवण | अंबूपाडा | शासकीय | सुरगणा |
| २० | कळवण | सारद | शासकीय | सुरगणा |
| २१ | कळवण | साल्हेर | शासकीय | सटाणा |
| २२ | कळवण | दहिंडुले | शासकीय | सटाणा |